REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 5 | FEBRUARY - 2018

# यहुदी राष्ट्रवादाचा उदय आणि विकास

**वळवी विश्वास गोरखनाथ**
संशोधक विद्यार्थी , सामाजिक शास्त्रे प्रशाळा विभाग, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव.

**सारांश :-**

आज जगातील एकमेव राष्ट्र ज्याची निर्मिती अध्यात्मिक राष्ट्रवादावर झाली, ते राष्ट्र म्हणजे इस्त्रायल. मुठभर असलेले हे यहुदी गेल्या चार हजार वर्षापासून जगाच्या कानाकोपऱ्यात भटकत असतांना देखील स्वतःची संस्कृती आणि बायबलच्या भविष्यवाणीला पकडून आपला राष्ट्रवाद जीवंत ठेवला. तसेच १९१९ च्या बेलफोर जाहीरनामा, झायोनिस्ट चळवळ, हीटलरने घडविलेले होलॉकॉस्ट या सर्व घटना जणू इतिहासाचे पुनर्विलोकन करुन यहुदी लोकांना एका नव्या राष्ट्रासाठी सज्ज करत होते. त्यातच १९४७ ला इस्त्रायल या राष्ट्राची निर्मिती झाली. त्याच्या निर्मितीमागील हा राष्ट्रवाद संशोधकाने बायबल, यहुदी धर्म आणि ख्रिस्ती धर्म यांच्या तत्वज्ञानातून मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**प्रस्तावना :**

देवाने जगाची उत्पत्ती केल्यानंतर आदाम आणि हवा यांची निर्मिती करतो. पुढे या दोघांनी पाप केल्यामुळे देव त्यांना ऐदेन बागेतून हाकलुन लावतो आणि येथूनच मोक्षाची योजना सुरु होते. पुढे देव अब्राहम, इसहाक आणि याकुब बरोबर करार करतो. याकुबपासुन ज्या बारा पुत्रांचा जन्म झाला त्यांनाच बारा गोत्र म्हटले गेले आणि याच बारा गोत्रापासून इस्त्राएल या राष्ट्राची निर्मिती झाली. याच गोत्रातून एक गोत्र म्हणजे यहुदा. यहुदा गोत्रातुन इस्त्राएलचा महान राजा दाऊद आणि प्रभु येशुचा भविष्यात जन्म झाला. बारा गोत्रातुन लेवि गोत्रात यहुदी धर्माचा संस्थापक मोशेचा जन्म होतो आणि यहोवा देव याने इजिप्तमधील गुलामीत असलेल्या आपल्या बारा गोत्रांना सुटकारा देण्यासाठी मोशेला पाचारण करतो. मोशे यहुदी लोकांना गुलामीतुन सोडविल्यानंतर देवाने सांगितलेल्या पवित्र भुमित, पॅलेस्टाईन, इस्त्राएल, कनान व वचनदत्तभूमी या वेगवेगळ्या नावाने ओळखल्या गेलेल्या वतनात घेवुन जातो. या ४० वर्षाच्या प्रवासात देव मोशेला १० आज्ञा तसेच साक्षीचा कोश आणि निवास मंडपाची योजना देतो. तसेच अनेक सामाजिक नितीमुल्य शिकवतो आणि पुढे याच नियमातुन यहुदी धर्माची बीजे रोवली गेली. म्हणुन मोशेला यहुदी धर्माचा संस्थापक असे म्हटले जाते.

**अब्राहम :-**

यहोवाने सर्वात पहिले वचनदत्त भुमी देण्याचे वचन अब्राहमला दिले आणि त्याच्यासोबत करार केला. "तेव्हा परमेश्वराने अब्राहमला सांगितले होते की, तु आपण, आपला देश आणि आपले कुळ आणि आपल्या बापाचे घर यापासून निघून जो देश मी तुला दाखविन, त्यात जा."[१] अब्राहम ऊर नावाच्या प्रदेशात राहत होता. तो खुपच श्रीमंत होता. तरी देखील त्याने यहोवाची आज्ञा मानून कनान देशाकडे प्रस्थान केले. अब्राहम आणि सारा यांच्यापासून ईसहाकचा जन्म झाला. तो अब्राहमचा प्रिय आणि एकुलता पुत्र होता. पण देवाने अब्राहमला सांगितले, "देवाने अब्राहमची परिक्षा घेतली, तेव्हा त्याला म्हटले, हे अब्राहमा, मग हा बोलला, मी येथे आहे आणि तो बोलला, आता तुझा पुत्र तुझा



एकुलता त्यावर तु प्रिती करीतो... व त्याला होमरुप समर्पन कर."[२] देवाने सांगितल्याने अब्राहम इसहाकला घेवुन मोरया पर्वतावर गेला आणि त्याला होम अर्पण करणारच तेवढ्यात देव बोलला, "हे अब्राहमा, अब्राहमा, मग हा बोलला मी येथे आहे. मग तो बोलला तु आपला हात मुलग्यावर टाकु नको.... मी जाणतो की तु देवाला भितोस, कारण की तु आपला एकुलता याला मजपासुन राखिले नाही."[३] अब्राहमाला येथूनच विश्वासाचा बाप राष्ट्राचा बाप असे देवाने म्हटले. कारण त्याने देवासाठी स्वतःचा मुलगा देखील राखिला नाही आणि या घटनेपासून प्रभू येशूची योजना देव भविष्यासाठी जाहीर करतो. "इसहाक का भेट चढाना मसीह की मृत्यू की भविष्यवाणी की एक तस्वीर थी । एक पिता का अपने बेटे को भेट चढाना... ठीक उसी जगह

जहॉं दो हजार वर्ष बाद परमेश्वर का खुद का बेटा चढाया गया था । इस प्रकार यह एक छाया थी । एक इब्री जाती के जन्म की । एक महान घटना जिसे लाने हेतु एक जाती का जन्म हुआ ।"[४] प्रभु येशुचे बलिदान देखील मोरया पर्वतावरच झाले. वरील घटना प्रभु येशुचा मृत्यू कशी होणार, याची प्रतिछाया आहे. "सारा की मृत्यू १२७ वर्ष की उम्र में हुयी थी । जब की उस समय इब्राहीम १३७ वर्ष का था । वह उसके बाद ३८ वर्ष और जिया ... इब्राहीम महान, पवित्र और अत्यंत आदरणीय कुलपति यहुदीयों मुसलमानों और मसिहीयों में सबसे आदरणीय था । परमेश्वर का मित्र, विश्वासों का पिता । उदार, निस्वार्थ एक महान चरित्रवान, परमेश्वर पर अतुट विश्वास करनें वाला था ।"[५]

**इसहाक :-**

अब्राहमनंतर त्याचा पुत्र इसहाक याच्यासोबत यहोवा वचनदत्त भुमी देण्याचा करार करतो. "आणि परमेश्वराने त्याला दर्शन देवून सांगितले होते की, तु मिसर देशात उतरु नको. जो देश मी तुला सांगिन, त्यात रहा. या देशात तु प्रवासी रहा... तुझ्या संतानाला हे सर्व देश मी देईन आणि तुझा बाप अब्राहम याजवळ जी शपथ खाल्ली, ती तुझ्यासोबत खातो."[६]

**याकोब :-**

इसहाक वृध्दावस्थेत गेल्यावर त्याने याकुबला आशिर्वाद दिला. "आणि सर्व समर्थ देव तुला आशिर्वाद देवो आणि तुला सफळ करुन असे वाढवो की, त्या राष्ट्राचा समुदाय व्हावा आणि तुला अब्राहमाचा आशिर्वाद देवो. तुला आणि तुझ्या संतानाला असे की, तुझ्या प्रवासाचा जो देश देवाने अब्राहमाला दिला, त्याचे वचन तुला पावावे."[७] इसहाकने याकुबला आशिर्वाद दिला आणि म्हटले तुझ्या पुर्वजांना जी वचनदत्त भुमी यहोवा देणार होता. ती तुला देवो आणि तुझ्यापासुन एक राष्ट्र उत्पन्न होवो. पुढे देवाने याकुबला दर्शन देवून सांगितले. "तर याकोब पदम अरामातुन येत असता त्याला देवाने फिरुन दर्शन दिले आणि त्याला आशिर्वाद दिला. तेव्हा देवाने त्याला सांगितले. तुझे नाव याकोब आतापासून तुझे नाव याकोब म्हटले जाणार नाही, परंतु इस्त्राएल तुझे नाव होईल. तसे त्याने त्याचे नाव इस्त्राएल ठेविले... तुझ्यापासून राष्ट्र व राष्ट्रसमुदाय होईल आणि तुझ्या कंबरेतुन राजे निघतील."[८] देवाने याकोबाचे नाव इस्त्राएल ठेवले. पुढे याकोबाचे १२ पुत्र इस्त्राएल राष्ट्राचे १२ गोत्र म्हणुन ओळखले गेले. "उसके दो पत्नीया और दो उपपत्निया थी । जिन्हे एकको छोडकर वह नही चाहता था । और जो उसपर थौपी गयी । यदपी बारा बेटे उत्पन्न हुए थे । लिआ से : रुबेन, सिमोन, लेवी, यहोदा, ईस्साकार, जुबुलुन । राहेल से : युसुफ, बिन्यामीन । जिल्फा से लिया की लौंडी : गाद, अशेरा । बिल्ला से राहेल की लौंडी : दान, नप्ताली ।"[९] याकुबपासुन या बारा पुत्रांची उत्पत्ती झाली आणि पुढे युसुफ हा इजिप्तमध्ये जेव्हा सर्वोच्च पदावर पोहचला. त्यावेळी संपूर्ण जगात दुष्काळ पडलेला होता. "याकोबबरोबर एकंदर ६६ लोक मिसर देशात गेले. यात याकोबाच्या मुलांचा, बायकांचा सामावेश केलेला नाही. योसेफ आणि त्याचे दोन पुत्र धरुन याकोबाच्या कुटूंबात मिसर देशात एकंदर सत्तर लोक होते."[१०] या ७० लोकांतुन इस्त्राएलचे १२ गोत्र वाढत गेले आणि ४०० वर्ष इजिप्तच्या फारोने त्यांना गुलामीत ठेवले. या गुलामीतून त्यांना सोडविण्यासाठी देवाने मोसेला पाचारण केले.

**मोसे आणि यहुदी धर्माची स्थापना :-**

४०० वर्षाच्या गुलामीत यहुदी लोकांवर इजिप्तमध्ये फारोने वेगवेगळ्या प्रकारे अत्याचार केले. "देव मोशेला म्हणाला, माझ्या लोकांचा मिसर देशात होत असलेला छळ मी पाहिला आहे... मिसरी लोक माझ्या इस्त्राएली लोकांवर करीत असलेले अत्याचार मी पाहिले आहेत. माझ्या इस्त्राएली लोकांना फारोच्या तावडीतून सोडविण्यासाठी मी तुला फारोकडे पाठवित आहे. त्याच्याकडे तु जा."[११] देवाने मोशेला दर्शन देवून त्याच्यासोबत करार केला आणि म्हटले, मी तुला माझ्या लोकांना सोडविण्यासाठी इजिप्तला पाठवितो. "यहुदी लोकांचा एक महान नेता म्हणजे मोशे. इ.स.पूर्व १५०० मध्ये तो जन्मला होता. मिसरातून यहुदी लोकांची गुलामगिरीतून सुटका करण्याचे नेतृत्व त्याने केले. देवाने दिलेल्या दहा आज्ञा त्याने त्या यहुदी लोकांना दिल्या. देवाच्या मार्गात त्यांनी चालावे यासाठी त्या आज्ञा देण्यात आल्या. शिनायच्या वाळवंटात त्याने ४० वर्ष यहुदी लोकांचे पुढारीपण केले. जुन्या काळातील पहिली ५ पुस्तके त्याने लिहीले."[१२] देवाने सांगितल्याप्रमाणे मोशेने ४० वर्ष यहुदी लोकांची सेवा केली. एक मंडळी म्हणुन देवाने यहुदी लोकांना पाचारण केले. उत्पत्ती, निर्गमन, लेवीय, गणना आणि अनुवाद ही बायबलची पहिली पाच पुस्तके मोशे याने लिहीली. "मोशे म्हणजे पाण्यातून बाहेर काढलेला."[१३]

**यहुदी धर्म म्हणजे काय ?**

इस्त्राएलच्या बारा गोत्रापैकी यहुदा हा सर्वोच्च गणला गेला. कारण याकोब याने इजिप्तमध्ये असतांना आपल्या मृत्यूअवस्थेत आपल्या बारा पुत्रांना आशिर्वाद दिला. त्यात यहादाला सर्वोच्च स्थान दिले. म्हणुन यहुदा गोत्र प्रथम गणला गेला. बाकी ११ गोत्राचा उल्लेख आता यहुदी किंवा इब्री असा केला जाऊ लागला आणि या ११ गोत्रातुन जो सर्वोच्च गणला गेला, तो यहुदा पुढे यहुदी धर्म म्हणुन मान्य पावला. "यहुदा तुझे भाऊ तुझी वाखाणणी करतील... यहुदा सिंहाचा बछडा आहे.... शिलो येईपर्यंत यहुदाकडे असलेला राजदंड कोणाला काढून घेता येणार नाही. त्याच्या वंशजाकडे शासनाची सुत्रे सर्वकाळ राहतील. राष्ट्र त्याला खंडणी देतील."[१४] यहुदी वंशात भविष्यात ख्रिस्त येणार आहे

आणि हे अध्यात्मिक राज्य कधीही लयास जाणार नाही. म्हणुन यहुदी गोत्र श्रेष्ठ आहे. कारण इस्त्राएलने (याकोबने) त्याला आशिर्वादात प्रथम गणिले होते.

### यहुदी धर्माचे साहित्य :-

यहुदी धर्मामध्ये तोरहा हा मुख्य ग्रंथ होय. यालाच Old Testament असे देखील म्हणतात. तरी या ग्रंथाच्या निर्मितीमागे मोशेची बायबलमधील पाच पुस्तके कारणीभूत ठरली. ती म्हणजे उत्पत्ती, निर्गमन, लेवीयन, गणना आणि अनुवाद. "ओल्ड टेस्टामेंटची पुरवणी म्हणजे ॲपाक्रिया हा ग्रंथ. धार्मिक आचार व नितीमुल्य यांची माहिती देणारी चौदा प्रकरणे त्यात आहेत. मोझेशने आपले ईश्वरी आदेश तोंडी सांगितले. त्यावरील स्पष्टीकरणात्मक भाष्य म्हणजे हालाखा व त्याचे संपादन करुन तयार झालेला ग्रंथ मिशना."[१५] ॲपाक्रिया हा जुन्या कराराचा भाग आहे. तर हालाखा मोशेने लिहीलेली पाच पुस्तकांवरील भाष्य आहे. भविष्यकाळात हालाखा ज्या लोकांनी संपादन करण्याचा प्रयत्न केला, त्यांनी मिशना हा यहुदी धर्मग्रंथ म्हणुन जाहीर केला. "मिशनावरील टिकाग्रंथ जो गेमारा मिशना व गेमारा हे दोन्ही मिळुन टॅलमुड हा ग्रंथ तयार करण्यात आला... टॅलमुड नव्याने संपादन केले गेले.... पुढील काळात त्याचा व्यापक प्रमाणावर जसा प्रचार होत गेला, तसतसे ख्रिस्ती धर्माचे वेगळे व स्वतंत्र अस्तित्व ख्रिस्ताच्या अनुयायांमध्ये स्थिर झाले."[१६]

| अ.क्र. | ग्रंथ | ग्रंथाचे विस्तारीत रुप |
|---|---|---|
| १ | अपाक्रिया | जुन्या कराराची पुरवणी |
| २ | हालाखा | मोशेच्या पाच पुस्तकावरील भाष्य |
| ३ | मिशना | हालाखाची संपादीत आवृत्ती |
| ४ | गेमारा | मिशनावरील टिकाग्रंथ |
| ५ | टॅलमुड | मिशना व गेमाराची एकत्रित आवृत्ती |

यहुदी धर्माचा मिशना आणि गेमारा मिळुन अंतिमतः टॅलमुड हा ग्रंथ तयार झाला. जो सध्याच्या यहुदी धर्माचा धर्मग्रंथ आहे.

### दहा आज्ञा (Ten Comands) :-

दहा आज्ञा या सुरुवातीला यहुदी धर्माची आधारशिला होत्या. या दहा आज्ञांवरुन मोशेने यहुदी धर्मासाठी नियमावली तयार केली. "(१) एकच देव असावा, (२) कोरीव मुर्ती करु नये, (३) शपथ घेवू नका, (४) सब्बाथ पवित्रपणे पाळा, (५) पित्याचा आणि मातेचा मान राखावा, (६) खुण करु नये, (७) व्याभिचार करु नये, (८) खोटी साक्ष देवू नये, (९) अभिलाशा बाळगू नये, (१०) लोभ धरु नये."[१७] देवाने मोशेला दिलेल्या दहा आज्ञा मोशेने दोन शिलावर लिहुन घेतल्या. पुढे साक्षीचा कोश निर्माण झाला, त्यात हे दोन शिलालेख, हारुनची लाठी आणि स्वर्गीय मान्ना या वस्तू ठेवण्यात आल्या.

### यहुदी धर्माचे सण :-

देवाने मोशेला आणि मोशेने संपुर्ण यहुदी लोकांना सांगितले की, यहोवासाठी भक्ती कशी केली जाईल. सण हे देवाला शरण जाण्याचे प्रत्यक्ष कृतीकरण आहे. ज्यामध्ये यहुदी समाज पुढे नियमबध्द झाला. "इस्त्राएल लोकांस सांग की, देवाने नेमलेले सर्व सण त्यांनी पाळावे. सणाच्या वेळी सर्व इस्त्राएली लोकांनी मेळे भरवावे व माझी उपासना करावी."[१८]

### (१) साब्बाथवार :-

प्रत्येक विश्वासणाऱ्यांसाठी साब्बाथ म्हणजे पवित्र दिवस होय. या दिवशी स्वतः देवाने संपुर्ण सृष्टीची सहा दिवसात निर्मिती केली आणि सातव्या दिवशी देवाने विश्राम केला. म्हणुन यहुदी लोकांसाठी सहा दिवस त्यांनी काम करावे पण सातवा दिवस देवाचा साब्बाथ व पवित्र मेळाव्याचा दिवस आहे.

### (२) पासोव्हर (देवाला ओलांडून जाण्याचा सण) :-

पासोव्हर हा सण यहुदी धर्मात यहोवाची अर्पण विधीतील पहिला सण मानला जातो. "फसहकापर्व सुटकारे को दर्शाता है और बसंत ऋतु में इस्टर के पर्व के समय मनाया जाता है... हर यहुदी को इस पर्व को मनाने जेरुसलेम आना पडता था ।"[१९] प्रभु येशुला क्रुसावर चढविण्यात आले, तो दिवस देखील पासोव्हर सणाचाच होता. त्या दिवशी प्रभु येशुने संपुर्ण मानव जातीसाठी होमार्पण दिला.

**(३) खमीर न घातलेली भाकरीचा सण :-**

पासोव्हर एकच दिवसाचा असायचा पण खमीर न घातलेल्या भाकरीचा सण सात दिवस चालायचा. "अखमीरी रोटी का पर्व, जो हमारे लिए मरा उस पर विश्वास का प्रतिनिधी है।"[२०] खमीर शरीर प्रदर्शित करते तर अखमीर आत्म्याला सिंचीत करते म्हणुन देवाने प्रत्येक यहुदीला सात दिवस ही भाकरी खाऊन सण साजरा करायला लावला.

**(४) प्रथम फल आणि पन्नासवा दिवस :-**

"पहले उपज के पर्व के पचास दीन बाद पिन्तेकुस्त के पर्व को मनाते थे । प्रथम उपज का पर्व प्रभु येशु मसीह ओर हमारे पुनरुत्थान का प्रतीक है । (१ कुरी १५:२०) प्रभु येशु के पुनरुत्थान के पचास दिनके पश्चात पवित्र आत्मा शिशो पर उतरा - उसके बाद कलिसीया का जन्म हुआ ।"[२१] प्रथम फलाच्या सणापासुन तर पुढच्या सात शब्बादानंतर पुन्हा देवाला अर्पण केला जाई तो दीवस म्हणजे पन्नासवा दिवस होय.

**(५) रणशिंगाचा सण :-**

रणशिंगाचा सण इस्त्राएल लोक नवीन वर्ष म्हणुन साजरा करत, कारण त्यांना वाटे देवाने आम्हा बारा गोत्राला आज एकत्रित केले आहे. "स्मरण देण्यासाठी त्या दिवशी रणशिंगे (तुतारी) फुंका व पवित्र मेळा भरवा."[२२]

**(६) प्रायश्चित्ताचा दिवस :-**

"प्रायश्चित्त का अर्थ ढाकना । इस चढावे ने लोगो के पापो को ढापा जब-जब कि कलवरी के क्रुस पर महायज्ञ न चढाया गया ।"[२३] या दिवशी यहुदी समाज स्वतःचा पापांभिकार करतात. जसे प्रभु येशुने सर्वांसाठी महायज्ञ करुन क्रुसावर पापक्षालन केले.

**(७) मांडवाचा सण :-**

"सात दिवसापर्यंत देवाप्रीत्यर्थ मांडवाचा सण साजरा करावा... सतत सात दिवस देवाला द्रव्य अर्पण करावे. आठव्या दिवशी सर्व समाजाचा मेळावा भरवावा."[२४] हा वर्षाचा सातवा आणि शेवटचा सण असायचा. आज देखील यहुदी समाज हे सात सण आणि त्याचबरोबर जुबली वर्ष आणि सातवे वर्ष (छुटकाराचे वर्ष) साजरे करतात.

**साक्षीचा कोष :-**

साक्षीचा कोष कोणत्या प्रकारचा होता, हे सांगणे कठीण आहे. पण बायबलमधील निर्गमण २५:१० ते २२ या वचनात साक्षीचा कोष कोणत्या प्रकारे तयार केला गेला याची तपशिलवार माहिती दिलेली आहे. साक्षीचा कोष म्हणजे यहुदी धर्माचे पुजणीय स्थान होते. "आणि त्यांनी शिटी लाकडाचा कोश करावा. त्याची लांबी अडीच हात आणि त्याची रुंदी दीड हात आणि त्याची उंची दीड हात असावी... आणि शुध्द सोन्याचे दयासन जसे झाकण कर. त्याची लांबी अडीच हात व त्याची रुंदी दीड हात असावी.... मग मी तेथे तुला साक्षात भेटेन आणि इस्त्राएलच्या संतानासाठी त्या सर्व आज्ञा तुला देईन. त्या त्या दयासनाकडुन संकेतलेखाच्या कोशावर जे दोन करुब त्यांमधल्या जाग्यातुन तुला सांगेन."[२५] मोशेच्या आज्ञाप्रमाणे त्यांच्या कारागीरांनी हा साक्षीचा कोश तयार केला. यहुदी लोकांचा प्रवासात याच कोशाने त्यांच्या देवत्वाची कमी दुर केली. "कोशाच्या झाकणाला दयासन म्हटले जाई आणि ते शुध्द सोन्यात घडवलेले होते. (दयासन) असा हिब्रू शब्दाचा पारंपारीक अनुवाद त्यातुन बहुदा प्रायश्चिताचे स्थान सुचीत होत असावे... कोशाच्या आतमध्ये मोशेला सीनाय पर्वतावर देवाकडुन मिळालेल्या दहा आज्ञांच्या दोन दगडी पाट्या होत्या. तसेच यामध्ये मान्ना ठेवलेले सुवर्णपात्र आणि कळ्या आलेली अहरोनची काठीसुध्दा होती. (इब्री ९:४) इस्त्राएली लोकांना त्यांच्या अरण्यातील प्रवासात गरज लागेल, तेव्हा देवाने सर्व काही पुरवले याचीच आठवण यातून होते."[२६] यहुदी लोकांना मोसेमार्फत देव ज्याची सर्व काही अध्यात्मिक भुक मिटवित होता. साक्षीच्या कोशाच्या रुपाने ते आता देवाशी बोलु लागले. मोशे त्यांचा अध्यात्मिक गुरु तसेच सोडवणारा आणि यहुदी धर्मतत्वाचा निर्माणकर्ता झाला.

हा साक्षीचा कोश शालोमनचे मंदीर बांधले तेथे ठेवण्यात आला. पुढे नबुकदनसेर राजाने जेरुसलेम मंदीराचा विध्वंस केला. त्यानंतर त्याचा शोध लागु शकला नाही.

**निवासमंडप आणि त्याचे सामान :-**

"निवास मंडप म्हणजे सहज उचलुन नेता येणारा तंबु किंवा यज्ञमंडप. हेच इस्त्राएली लोकांचे त्यांच्या इतिहासाच्या आरंभी उपासना करण्याचे ठिकाण होते. जुन्या करारामध्ये यासाठी "दर्शनमंडप" असा उल्लेख वारंवार केला. यावरुन देव आणि त्याचे लोक त्यांच्या भेटीचे ते प्रमुख स्थान होते, असे दिसते."[२७] निवासमंडप म्हणजे इस्त्राएली लोकांचे देवस्थान होते. कारण देव याच निवासमंडपातुन मोशेद्वारे लोकांना भेटत असे. इस्त्राएली लोकांच्या चाळीस वर्षाच्या प्रवासात यहुदी लोकांनी याच निवासमंडपात भक्ती आणि आराधना केली. "निवासमंडपाच्या बाहेर अंगण होते. त्या अंगणाभोवती १५० फुट लांब व ७५ फुट रुंद एवढे आयताकृती कुंपण होते. (२७:९-१९) अंगणामध्ये पितळेची होमवेदी

होती. तिच्यावर पशुचे अर्पण केले जाई. (२७:१-८) तसेच पितळचे एक गंगाळसुध्दा होते. याजक या गंगाळात हात पाय धुऊन मगच निवासमंडपात प्रवेश करीत. (३०:१७-२१)"[२८] निवासमंडपात पवित्र स्थान आणि परम पवित्र स्थानाला खुपच महत्व होते. कारण वर्षातुन मुख्य याजक फक्त एकदा परमपवित्रस्थानात जात असे आणि लोकांची पार्पापणे अर्पण करीत, मोशेच्या नियमानुसार बारा गोत्रातुन लेवी गोत्राला याजक पदाची जिम्मेदारी आजीवन दिली गेली होती.

### (१) अहरोण - मुख्य याजक :-

अरण्यातील प्रवासामध्ये याजक पदाची स्थापना करण्यात आली. तेव्हा मोशेने आपल्या भावाला, अहरोणला इस्त्राएलचा पहिला मुख्य याजक म्हणुन वेगळे करुन नेमले. निवासमंडपाची जिम्मेदारी मोसेने देवाने सांगितल्याप्रमाणे अहरोणला दिली आणि पुढे वंशपरंपरेने (गोत्र परंपरेने) लेवी गोत्रातुनच मुख्य याजकपद दिले जाऊ लागले. मुख्य याजक त्याच्या खाली असलेले याजक यांच्यावर अधिकार ठेवत असे, कारण निवास मंडपातील होमवेदी, गंगाळ, धुपवेदी, कराराचा कोश या जागांवर अनेक उपयाजकांची नियुक्ती केली गेली होती. "आणि जेव्हा अहरोण पवित्रस्थानात जातो तेव्हा त्याने इस्त्राएलचा संतानाची नावे परमेश्वरासमोर अखंडीत सुचविण्यासाठी न्याय ठरण्याचा उरपटात आपल्या हृदयी वाहावी..."[२९]

### (२) पितळेचे गंगाळ :-

"धुवायासाठी तु पितळाचे गंगाळ व त्याची पितळाची मांडणी कर, आम्ही त्यांना सभामंडप व वेदी यांच्यामध्ये ठेवुन त्यात पाठी ठेव."[३०] या गंगाळात याजकांनी आपले हात-पाय धुवून मगच निवासमंडपात प्रवेश करावा, असा नियम होता.

### (३) होमार्पणाची वेदी :-

"आणि तु शिटी लाकडाची वेदी कर, पाच हात लांब व पाच हात रुंद अशी वेदी चौरस असावी आणि तिची उंची तीन हात असावी... आणि वेदीसाठी काठ्या कर. काठ्या, शिटी लाकडाच्या असाव्या आणि तु त्यास पितळाने मढ."[३१] होमवेदी ही निवासमंडपासमोर होती. मुख्य याजक या वेदीवर पशुचे बली देत असे आणि ते रक्त वेदीवर शिंपण्यात येत असे.

### (४) सोन्याचा दिपवृक्ष :-

"आणि तु शुध्द सोन्याने दिव्याचे झाड कर. ते दिव्याचे झाड घडीव असे करायचे आहे. त्याचे कांड व त्याच्या खांद्या, त्यांची वाताघरे, त्यांची बोंडे व त्यांची फुले त्याचीच असावी... जसे तु त्याचे सात दिवे कर आणि त्याने त्याच्या पुढच्या अंगी उजेड पाडावा म्हणुन कोणी त्याचे दिवे उजळावे."[३२] पवित्रस्थानामध्ये सोन्याचा दिपवृक्ष लावण्यात आला होता. या दीपवृक्षाला सात वाट्या होत्या आणि त्यात सात दिवे लावण्यात आले होते. या दिव्यातुन निघणारा प्रकाश हा निवासमंडपात संपूर्ण रात्रभर कार्यरत असणाऱ्या याजकासाठी होता.

### (५) भाकरी मांडण्याचे मेज :-

"आणि तु शिटी लाकडाचे मेज कर... आणि मेजावर दर्शनीय अपूप माझ्यासमोर अखंडीत ठेव."[३३] या मेजवर बारा गोत्रासाठी बारा भाकरी रोज ठेवण्यात येत असे. तसेच होमार्पणाची अर्पणे देखील याच मेजवर ठेवली जात असे.

### (६) धुपवेदी :-

"आणि तु धुप जाळण्यासाठी धुपवेदी कर... आणि अहरोणाने सुगंध द्रव्याचा धुप तिजवर जाळावा."[३४] धुपवेदीत याजक अनेक प्रकारची सुगंधीत द्रव्ये जाळत असे. ज्यामुळे संपुर्ण निवासमंडपात चांगले वातावरण निर्माण होत असे. अशा प्रकारे मोशेच्या नियमानुसार निवासमंडप तयार करण्यात आलेला होता.

## आधुनिक इस्त्राएल राष्ट्राची निर्मिती

इस्त्राएल हे एक ज्यु राष्ट्र असून यहुदीयांच्या एकछत्री राष्ट्रवादातून त्याची निर्मिती झाली आहे. "आज इस्त्राएल हे मध्य-पुर्वेमधील छोटे राष्ट्र आहे. ते भुमध्य समुद्राच्या पुर्व किनाऱ्यावर वसलेले आहे. १९४७ मध्ये यहुदी लोकांसाठी या राष्ट्राची स्थापना झाली. हेच राष्ट्र देवाने अब्राहमाच्या संतानासाठी करारबध्द केले होते. (उत्पत्ती १२:४७) या राष्ट्राचे प्रमुख शहर आजही येरुसलेम हेच आहे. नव्या काळातील यहुदी राष्ट्रांची तीच राजधानी होती."[३५] यहुदी राष्ट्राची स्थापना म्हणजे प्रभु येशुच्या अध्यात्मिक राज्याचे भौतिक रुप होय. त्यामुळे अन्य ख्रिस्ती इतिहासकार हा काळ प्रभु येशुच्या आगमनाशी जोडतात. "इस्त्राएल या नावाचा उगम हिब्रु बायबलमध्ये आढळुन येतो. जेकबचे एका विचित्र शक्तीबरोबर मलयुध्द झाल्यावर त्याला इस्त्राएल हे नाव मिळाले... आधुनिक इस्त्राएलच्या लोकांना मराठीत इस्त्रायली असे संबोधतात."[३६] इस्त्राएल राष्ट्राच्या उत्पत्तीबरोबरच अनेक समस्या यहुदी राष्ट्रांसमोर होत्या. त्यात अरब-इस्त्राएल संघर्ष, जे जवळजवळ आजतागायत सुरु

आहेत. "१८९० पासुनच यहुदी लोकांवर युरोपात अत्याचार होऊ लागले. त्यातच हिटलरने गॅस चेंबरमध्ये ४.२ मिलियन यहुदी लोकांना ठार मारले. म्हणुन झायोनिस्ट चळवळीचा उदय झाला. पुढे बॉलफेर डिक्लरेशनमुळे यहुद्यांनी पॅलेस्टाईनमध्ये जमिनीच्या माध्यमातून हस्तांतरणाचे धोरण स्विकारले.यालाच जेव्हिस सेटलमेंट असे म्हटले जाते. तसेच ब्रिटनने एक ब्रिटीश मंडळ पॅलेस्टाईनला शांती आणि सुव्यवस्था राखण्यासाठी पाठविले. अशा अनेक घटनेनंतर यहुदी राष्ट्राची निर्मिती १९४८ ला घडून आली. यहुदी राष्ट्र निर्मितीनंतर देखील इस्त्राएलला इतर अनेक संघर्षांना तोंड द्यावे लागते. त्यात इस्त्राएल-अरब संघर्ष, पी.एल.ओ. संघटनेचे वर्चस्व, हमास आतंकवादी संघटनेचा उदय या सर्व घटनेंमुळे इस्त्राएल आज जगाच्या दृष्टिक्षेपात आहे."[३७]

**संदर्भ सूची :-**


१) उत्पत्ती, १२ - १, बायबल.
२) उत्पत्ती, २२ - १ ते २, बायबल.
३) उत्पत्ती, २२ - ११, बायबल.
४) हेली की बायबल हस्तपुस्तीका, अनु. प्रो.एस.के.हरमिट, ऑथेंटीक प्रकाशन, सिकंदराबाद, प्रथम आवृत्ती, २००६, पृष्ठ क्र. ९९.
५) उपरोक्त १००.
६) उत्पत्ती, २६ - २ ते ३, बायबल.
७) उत्पत्ती, २८ - ३ ते ४, बायबल.
८) उत्पत्ती, ३५ - ९ ते ११, बायबल.
९) हेली की बायबल हस्तपुस्तीका, अनु. प्रो.एस.के.हरमिट, ऑथेंटीक प्रकाशन, सिकंदराबाद, प्रथम आवृत्ती, २००६, पृष्ठ क्र. १०२.
१०) उत्पत्ती, ४६ - २६ ते २७, बायबल.
११) निर्गमन, ३ - ७ ते १०, बायबल.
१२) Vyavaharik Navin Karar Tika Sangrah, Thomas Hale and Stephen Thorson, Translated to Pro.Subhash Shinde, Rev. Sudhir Ingale, Joint Published by CCMI & OM India, Andhra Pradesh, First Marathi Edition, 2007, PP. 21.
१३) निर्गमन, २:१०, बायबल.
१४) उत्पत्ती, ४९ - ८ ते १०, बायबल.
१५) ख्रिस्त, बुध्द आणि श्रीकृष्ण, डॉ.वि.रा.करंदीकर, स्नेहल प्रकाशन, पुणे, वर्ष ५ ऑक्टोबर, २००८, पृष्ठ क्र. २०.
१६) उपरोक्त, पृष्ठ क्र. २०.
१७) निर्गमन, २० - ३ ते १७, बायबल.
१८) लेविय, २३:२, बायबल.
१९) बायबल सर्वेक्षण, हेनरीन सी मियर्स, अनु. जगधारी मसीह, ऑथेंटीक प्रकाशन, हैद्राबाद, प्रथम आवृत्ती, वर्ष १९९४, पृष्ठ क्र. ६०.
२०) उपरोक्त, पृष्ठ क्र. ६०.
२१) उपरोक्त, पृष्ठ क्र. ६०.
२२) लेवीय, २३:२४, बायबल.
२३) बायबल सर्वेक्षण, हेनरीन सी मियर्स, अनु. जगधारी मसीह, ऑथेंटीक प्रकाशन, हैद्राबाद, प्रथम आवृत्ती, वर्ष १९९४, पृष्ठ क्र. ६१.
२४) लेवीय, २३ - ३४ ते ३६, बायबल.
२५) निर्गमन, २५ - १० ते २२, बायबल.
२६) पवित्र शास्त्रातील नकाशे आणि तक्ते, म.म.सुरवाडे, जीवनवचन प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, वर्ष २०१०, पृष्ठ क्र. ३३-३४.
२७) उपरोक्त, पृष्ठ क्र. ३५.
२८) उपरोक्त, पृष्ठ क्र. ३५.
२९) निर्गमन, २९:२९, बायबल.
३०) निर्गमन, ३०:१८, बायबल.
३१) निर्गमन, २७ - १ ते ८, बायबल.
३२) निर्गमन, २५ - ३१ ते ४०, बायबल.
३३) निर्गमन, २५ - २३ ते ३०, बायबल.
३४) निर्गमन, ३० - १ ते १०, बायबल.

३५) Vyavaharik Navin Karar Tika Sangrah, Thomas Hale and Stephen Thorson, Translated to Pro.Subhash Shinde, Rev. Sudhir Ingale, Joint Published by CCMI & OM India, Andhra Pradesh, First Marathi Edition, 2007, PP. 11.

३६) mr.wikipedia.org/5a50

३७) youtube.com/watch.2V=9tahgGLGSuk&t=16953/studyIQ





**वळवी विश्वास गोरखनाथ**
**संशोधक विद्यार्थी , सामाजिक शास्त्रे प्रशाळा विभाग, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव.**